# एका उदार साहित्यिकाच्या सान्निध्यात

स्नेह

जयंत नारळीकर

पुणे

ती स-पस्तीस वर्षांपूर्वीची केंब्रिजमधील एक रम्य उन्हाळी दुपार. मी आणि एक सहविद्यार्थी कॅम नदीकाठच्या हिरवळीवर विसावलो होतो. पाठीमागे किंग्स कॉलेजचे जगप्रसिद्ध चॅपल व त्यात टूरिस्टांची ये-जा चालू. एकंदरितच वातावरणात सुस्ती; त्यातून अभ्यासाची कुठलीही निकड नाही. केवळ येणाऱ्या-जाणाऱ्यांचे निरीक्षण हाच काय तो उद्योग.

"ते पाहा," माझा मित्र एकदम उद्गारला. किंग्सच्या गिब्स बिल्डिंगमागच्या विशाल हिरवळीवरून एक वृद्ध व्यक्ती अडखळत, धडपडत चालली होती. ते कॉलेजचे फेलो असणार, हा निष्कर्ष काढायला शेरलॉक होम्सची गरज नव्हती. त्या गालिचावजा हिरवळीवरून जाण्याचा हक्क फक्त फेलो मंडळींचा.

"मिस्टर फॉर्स्टर" माझ्या प्रश्नांकित चेहऱ्याकडे पाहत मित्र म्हणाला.

"फॉर्स्टर? म्हणजे कोण?"

"अरे बाबा, दीऽऽ मिस्टर फॉर्स्टर... 'पॅसेज टू इंडिया'चे लेखक." माझी कीव असल्याची किंचितशी झलक मित्राच्या उत्तरात होती; पण आता माझी ट्यूबलाइट पेटली होती व सुस्तीही पळाही होती. ती व्यक्ती आपल्या 'शाफ्लिंग स्टाइल'ने हिरवळ पार करून कॉलेजात शिरेपर्यंत मी पाहत होतो. मनात विचार आला, "आपण कधी तरी या कॉलेजचे फेलो बनून फॉर्स्टरसाहेबांबरोबर सुसंवाद साधू शकू का... याच हिरवळीवर?"

X X X

कदाचित, त्या दिवशी मी कल्पतरूखाली बसलो असेन. कारण काही महिन्यांनीच 'किंग्स'चा 'बॅरी रॅम्से फेलो' म्हणून माझी निवड झाली. सहाव्या हेन्रीने बांधायला सुरवात केलेल्या व आठव्या हेन्रीने पूर्णत्वाला आणलेल्या त्या पाच शतकांच्या जुन्या चॅपलमध्येच मला फेलोशिप प्रदान करण्यात आली. त्या रात्री नव्या फेलोच्या सन्मानार्थ कॉलेजच्या 'हाय टेबल'वर मेजवानी होती. माझे स्थान कॉलेजप्रमुख (प्रॉव्हस्ट नोएल आनन (आता लॉर्ड आनन) यांच्या शेजारी होते. समोर उपप्रमुख होते आणि माझ्या दुसरीकडे? 'इथे कोण अनोळखी व्यक्ती बसणार', अशा विचारात असतानाच मी पाहिले... अडखळत, धडपडत तेथे येऊन बसले फॉर्स्टरसाहेब.

नुकतीच चॅपलमध्ये इतर उपस्थित फेलोजबरोबर त्यांचीही औपचारिक ओळख करून देण्यात आली होती; पण आता संभाषणाची संधी होती. इतक्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व्यक्तीशी काय बोलणार? त्यातून ते साहित्यिक आणि मी विज्ञानातला.

"तू भारतातल्या कुठल्या भागातून आलास?" त्यांनी प्रश्न टाकला.

"मी कोल्हापुरात जन्मलो आणि बनारसमध्ये वाढलो." बनारस हे बहुतेक इंग्रजांना माहीत असते; पण कोल्हापूर? इथेच फॉर्स्टरनी मला आश्चर्याचा धक्का दिला. जणू आपल्या गावचा माणूस भेटला अशा उत्साहात ते म्हणाले, "कोल्हापूर? माझा देवास राज्याशी निकटचा संबंध होता आणि देवास- कोल्हापूर राजघराण्यांना नात्यांनी जोडलं आहे."

"होय, खरंच की," मी म्हणालो. कोल्हापूरचे त्या वेळचे छत्रपती देवासकडचे हे मला अंधुकसे आठवले.

X X X

लग्न न झालेला फेलो कॉलेजमध्ये राहू शकतो. त्या प्रघातानुसार मला कॉलेजमध्ये राहण्याकरिता खोल्या देण्यात आल्या. खोल्या नेमून देण्याचे काम उपप्रमुखांचे असे. त्यांनी मला सांगितले, की फॉर्स्टरसाहेबांच्या (तेही ब्रह्मचारीच होते) शेजारच्या खोल्यांचा नुकताच रिकामा झालेला संच मला द्यावा, अशी त्यांची इच्छा होती.

माझा संच 'ए-४' तर फॉर्स्टरसाहेबांचा 'ए-३.' माझ्या खोल्यांतून कॉलेजच्या समोरच्या हिरवळीचे आणि चॅपलचे सुंदर दृश्य दिसे... ज्यासाठी दूर देशांतून प्रवासी कॅमेरे घेऊन गर्दी करतात. इथे राहणाऱ्या फेलोची एक 'ड्यूटी' होती; त्यांच्या बिछान्याशेजारी एक घंटा होती. फॉर्स्टरसाहेबांना कधी कधी फिट येई. त्यापूर्वी अस्वस्थ वाटल्यास मदतीसाठी त्यांनी ही घंटा वाजवायची; पण ही ड्यूटी बजावण्याचा प्रसंग माझ्यावर कधी आला नाही. तरी त्या वेळी अशा मोठ्या व्यक्तीशेजारी राहणे ही मला मोठी जबाबदारी वाटली.

मी 'ए-४' मध्ये राहायला गेलो, तेव्हा फॉर्स्टरसाहेब मला म्हणाले, "मी तुला जयंत या नावानं संबोधीन आणि तू मला 'मॉर्गन' म्हण." पहिला भाग सोपा होता; पण दुसरा प्रथम प्रथम अडचणीत टाकणारा होता. कारण एडवर्ड मॉर्गन फॉर्स्टर यांचे वय माझ्या वयाच्या तिपटीहून जास्त होते.

X X X

'ए पॅसेज टू इंडिया'मध्ये भारतीय व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे यशस्वी चित्रीकरण करणारा मॉर्गन भारतात पुष्कळ वर्षे राहून आला असावा, असे वाटेल. वास्तविक, या लेखकानं एकूण दोन वर्षेसुद्धा या उपखंडात घालविली नसतील; परंतु या कालावधीत आपल्या अवलोकनशक्तीने त्याने बरेच काही टिपून ठेवले आणि लेखणीने मोजक्या शब्दांत कागदावर उतरवले. तीच अवलोकनशक्ती व शब्दांकनाची किमया मला जवळून पाहायला मिळाली. भारताबद्दल मॉर्गनची माहिती, जिज्ञासा आणि जिव्हाळा बोलण्यातून सहजगत्या दिसून येत. कोल्हापूर हा आम्हाला जोडणारा दुवा असला, तरी चर्चेचे विषय केव्हाच त्या पलीकडे पोचले.

X X X

मॉर्गनची दुसरी एक आठवण, त्याची फ्रेड हॉयेलबरोबर भेट झाली त्या वेळची. विज्ञानाचे शिक्षण त्याच्या 'व्हिक्टोरियन' काळातल्या विद्यार्थीदशेत नगण्यप्राय होते; पण आज विज्ञानात काय घडत आहे, हे जाणायची त्याला फार उत्सुकता होती. माझ्याकडून विश्वरचनाशास्त्रात काय नवे विचारमंथन व शोध चालू आहेत, हे तो आमच्या विविध चर्चांतून माहीत करून घेई. विज्ञानकथांतही त्याला रस होता. 'द मशिन स्टॉप्स' ही उत्कृष्ट विज्ञानकथा त्याने स्वतः लिहिली होती. या दोन्ही विषयांवर फ्रेड हॉयेलशी चर्चा करावी, असे त्याला वाटे. तशी चर्चा मी घडवून आणली आणि विलक्षण रंगली.

--- असे प्रसंग विरळच. कारण मॉर्गनचा स्वभाव संकोची, भिडस्त. एखाद्या व्यक्तीशी वेव्हलेंग्थ जुळली तरच त्याचे अंतरंग उघडणार. कुठली व्यक्ती उथळ, हे त्याच्या अचूक अवलोकनशक्तीला लगेच कळे. अशी व्यक्ती ठामपणे मत मांडू लागली, की मॉर्गनच्या अंतरंगाची दारे आपोआप बंद होत.

X X X

मी त्याला भेटलो, त्याचा शेजार अनुभवला, तो त्याच्या आयुष्याच्या आठव्या दशकात. वाढत्या वयोमानाप्रमाणे शरीर कमकुवत होऊ लागले तरी त्यांनी वृत्ती आनंदी ठेवली आणि दुसऱ्यांकडून स्वतःबद्दल फारशा अपेक्षा बाळगल्या नाहीत. "मी म्हातारा झालो, तर मॉर्गनप्रमाणे म्हातारे व्हावे, असे मला वाटते," असे साठी ओलांडलेले किंग्स कॉलेजचे एक फेलो मला म्हणाले होते. आज नव्वदी ओलांडून तेही मॉर्गनच्याच मार्गाने वाटचाल करीत आहेत. ही उदाहरणे मलाही स्फूर्तिदायक वाटतात.

सकाळ, 25.1.95